॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

या जगातील दुःखांपासून मुक्ती हवी
तर मार्ग आपणच शोधायला हवा.
- गौतम बुद्ध




अहिल्यानगर | बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२४ | वर्ष ५ वे | अंक २३१ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145



विरोधकांचे विकास कामे न करता वेगळ्याच विषयावर राजकारण

पान क्र. २ वर



चैतालीताई काळेंच्या कॉर्नर सभांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पान क्र. ३ वर



तरुण पिढीचे भविष्य घडविण्यासाठी कटिबद्ध

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### झारखंडमध्ये आज पहिल्या टप्प्यातील मतदान

**नवी दिल्ली** – महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातील निवडणूक प्रचार सोमवारी समाप्त झाला. येथे पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला ४३ जागांसाठी तर उर्वरित ३८ जागांसाठी दुस–या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. 'इंडिया' आणि रालोआ (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) अशा दोन्ही आघाड्यांमध्ये अत्यंत चुरशीची लढत होत आहे. भाजपने केलेल्या जोरदार टीकेला काँग्रेसचे प्रत्युत्तर, आरोपांच्या फैरी आदींनी निवडणूक प्रचाराचा पहिला टप्पा गाजला. दरम्यान, 'झारखंडमध्ये आदिवासींची लोकसंख्या झपाट्याने घटत आहे. येथे भाजपचे सरकार आल्यास घुसखोरांची ओळख पटवून त्यांना हुसकावून लावण्यासाठी एक समिति स्थापन केली जाईल. तसेच त्यांनी बळकावलेल्या जमिनीवर पुन्हा दावा केला जाईल, आदिवासी महिलांशी विवाह करणाऱ्या घुसखोरांना जमिनीचे हस्तांतरण रोखण्यासाठी कायदा आणला जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली.

### कांद्याच्या दरात मोठी वाढ

**नवी दिल्ली** – घाऊक बाजारात दिवसेंदिवस जुन्या कांद्याची आवक घटत आहे. तर दुसरीकडे हलक्या प्रतीचा नवीन कांदा विक्रीसाठी येत आहे. त्यामुळे जुन्या कांद्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात जुन्या कांद्याचे दर ८० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. हे दर सुमारे महिनाभर कायम राहणार असल्याचा अंदाज व्यापारी व विक्रेत्यांनी सोमवारी वर्तविला. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात जुन्या कांद्याला प्रतिकिलोला ५५ ते ६५ रुपये दर मिळत आहे. तर नवीन कांद्याला ३० ते ४५ रुपये दर मिळत आहे. बाजारात १० ते १५ ट्रक जुन्या कांद्याची, तर ३० ते ३५ ट्रक नवीन कांद्याची आवक होत आहे. आवक वाढल्यानंतर जुन्या कांद्याच्या दरात घट होईल, अशी माहिती मार्केट यार्डातील कांद्याच्या व्यापाऱ्यांनी दिली आहे. डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात चांगल्या प्रतीचा नवीन कांदा बाजारात दाखल होईल. त्यानंतर मात्र जुन्या कांद्याच्या दरात घट होईल. तर दुसरीकडे नाशिकच्या बाजारपेठेत कांद्याच्या भावाने पाच वर्षांतील उच्चांक गाठला आहे. नाशिकच्या बाजारपेठेत कांद्याचा भाव ५२ रुपये किलोवरून ५८ रुपये किलोवर पोहोचला आहे.

# राज्यात सुटकेस पॉलिटिक्सवरुन आरोप-प्रत्यारोप

## उद्धव ठाकरेंची दुसऱ्या दिवशीही बॅग तपासली । ठाकरेंकडून बॅग चेकिंगचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर

**मुंबई । वीरभूमी** – बॅग चेकिंगच्या मुद्द्यावरून सध्या राजकारण तापलं आहे. यवतमाळच्या वणी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची सभा झाली. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे या सभेला गेले होते. यावेळी हेलिपॅडवर उतरताच उद्धव ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांच्या बॅग तपासण्यात आल्या. यामुळे उद्धव ठाकरे संतापले. या बॅग चेकिंगचा व्हीडिओ सोशल मीडियावर शेअर केला. तसंच भाषणातही या मुद्द्यावरून महायुतीवर निशाणा साधला.

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या बॅगांची मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी तपासणी करण्यात आली. यामुळे संतप्त झालेल्या उद्धव ठाकरे यांनी सामानाची तपासणी करणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांना फैलावर घेतले. राज्यात मोदी, शहांच्या सभा होत आहेत, त्यांच्याही बॅगा तपासा. असे सांगत तुमच्या पाकिटात किती पैसे आहेत, तुमचे नियुक्ती पत्र दाखवा, अशी उलटतपासणी उद्धव ठाकरे यांनी केली. दरम्यान, लातूरमधून ठाकरेंच्या हेलिकॉप्टर उड्डाणास परवानगी नाकारण्यात आल्याने त्यांच्या पुढील सभेचा खोळंबा झाला.

उद्धव ठाकरे मंगळवारी लातूर दौऱ्यावर होते. औसातील हेलिपॅडवर ठाकरेंच्या बॅगांची तपासणी करण्यात आली. सोमवारी यवतमाळच्या वणीतही ठाकरेंच्या बॅगा तपासण्यात आल्या होत्या. सलग दुसऱ्या दिवशी बॅगांची तपासणी करण्यात आल्यानंतर उद्धव ठाकरे संतप्त झाले.



यावेळी ठाकरेंनी निवडणूक अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती केली.

हेलिपॅडवर बॅगांची तपासणी झाल्यानंतर ठाकरेंच्या हेलिकॉप्टरला उड्डाणाची परवानगी नाकारण्यात आली. ठाकरेंना लातूरहून धाराशिवमधील उमरग्याला पुढील सभेसाठी जायचे होते. पण त्यांच्या हेलिकॉप्टरला उड्डाणास काही काळ परवानगी देण्यात आली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी सोलापुरात येणार असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव हवाई वाहतुकीवर निर्बंध आणण्यात आले होते.

पंतप्रधान मोदींचे विमान उतरेपर्यंत बाकीची उड्डाणे रोखण्यात आली. त्याचा फटका उद्धव ठाकरेंना बसला. हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाने ठाकरेंच्या हेलिकॉप्टरच्या टेक ऑफला परवानगी दिली नाही. टेक ऑफ रखडल्याने ठाकरेंचा खोळंबा झाला.

उद्धव ठाकरे यांच्या बॅगेची तपासणी होत असताना तुम्ही कधीपासून नोकरी करत आहात? आतापर्यंत किती जणांना तपासले, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना केला. मात्र, अधिकारी काहीच न बोलल्याने मीच आहे का तुमचा पहिला गिऱ्हाईक? असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. तुमच्यावर माझा राग नाही, पण राज्यात ज्या प्रकारे राजकारण सुरू आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला.

### बॅग तपासणीबाबत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

उद्धव ठाकरे यांच्या बॅगेची तपासणी करण्यावर शिवसेनेने (उबाठा) प्रश्न उपस्थित केल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यावर स्पष्टीकरण दिले आहे. कोणत्याही राजकीय पक्षांच्या उच्चपदस्थ नेत्यांच्या विमानांची आणि हेलिकॉप्टरची तपासणी करणे ही प्रचलित पद्धत आहे. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विमानांची आणि हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली होती, असे निवडणूक आयोगातील सूत्रांनी सांगितले. सर्व नेत्यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्याचे आदेश अंमलबजावणी यंत्रणांना मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम घोषित करताना दिले होते.

### माझ्याही बॅगेची तपासणी : अजित पवार

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या जाहीर सभा होत आहेत. त्यामुळे सभेला जाण्यासाठी हेलिपॅडवर उतरलो की निवडणूक अधिकारी बॅगेची तपासणी करतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही लोकसभा निवडणुकीत बॅगेची तपासणी करण्यात आल्याचे अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

### विरोधकांना त्रास देण्यासाठी खटाटोप : शरद पवार

विधानसभा निवडणुकीत महायुतीला पराभव दिसत असल्याने विरोधकांचा नाहक त्रास देण्यासाठी हा खटाटोप सुरू आहे, असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी महायुतीवर केला आहे.

# एसटीच्या बसेस इलेक्शन मोडवर

**मुंबई । वीरभूमी**– राज्यात एकाच टप्प्यात होणारी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक आयोगही सज्ज आहे. मतदानाचे यंत्र, साहित्य आणि मतदान पथकांना मतदान केंद्रापर्यंत नेऊन सोडण्याची आणि तिथून मतमोजणीसाठी नेण्याची जबाबदारी राज्य परिवहन (एसटी) महामंडळावर सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मतदानाची तारीख जसजशी जवळ येतेय, तसतशी राजकीय प्रचार सभांची तोफ जोमाने धडाडतेय. आपले आमदार निवडून देण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे.

निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर अशा २ दिवसांसाठी एसटीकडे तब्बल ९ हजार बसची मागणी केली. त्यापैकी १९ नोव्हेंबरला मतदान केंद्रावर साहित्य घेऊन जाण्यासाठी ८ हजार ९७८ बस वापरल्या जाणार आहेत आणि २० नोव्हेंबरला मतदान झाल्यानंतर यंत्र मतमोजणीच्या ठिकाणी नेण्यासाठी तेवढ्याच गाड्या वापरात असतील. तसेच २४५ बस पोलिस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव. प्रत्येक सजग भारतीय नागरिकाने देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपले बहुमूल्य मत द्यायलाच हवे. अर्थात २० नोव्हेंबरला राज्यात मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडतील. अशात हजारोंच्या संख्येने बस निवडणूक प्रक्रियेसाठी धावणार असल्याने नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# फिर एक बार महायुती सरकार!

## पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा

**पुणे । वीरभूमी**– काँग्रेसला केवळ सत्ता हवी आहे. त्यासाठी त्यांनी तुष्टीकरणाचा खेळ खेळला आणि तीच काँग्रेस दलित, आदिवासी, मागासवर्गीयांना तोडण्यासाठी प्रयत्नशील आहे. ओबीसी, एससी, एसटी यांच्यात वाद निर्माण करून त्यांना कमजोर करून आरक्षण काढण्याचे काम काँग्रेस करेल. त्यामुळे जनतेने सावध राहावे, 'हम एक रहेंगे, तो सेफ रहेंगे', असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी पुण्यामध्ये व्यक्त केले व 'फिर एक बार महायुती सरकार'ची घोषणा दिली.

'पुण्यातील लाडक्या बहीण आणि भाऊ यांना माझा प्रणाम' अशी मराठीमध्ये भाषणाला सुरुवात करत मोदी म्हणाले, मी महाराष्ट्राच्या विविध भागात फिरलो असून जनतेचे अभूतपूर्व समर्थन मला मिळत आहे. विमानतळ ते सभास्थळ अनेक लोक गर्दी करून अभिवादन करत होते. महाराष्ट्रामध्ये 'फिर एक बार महायुती सरकार' सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

परदेशी गुलामगिरी मानसिकता असलेल्या काँग्रेसने महाराष्ट्राचा सातत्याने अपमान केला आहे. वीर सावरकर यांना सतत ते शिव्या देतात. राहुल गांधी यांच्या तोंडून महाविकास आघाडीने वीर सावरकर, स्व. बाळासाहेब ठाकरे यांची स्तुती करून दाखवावी, असे आव्हान मोदी यांनी दिले. ही निवडणूक देशाला विकासाच्या वाटेवर नेणारी असल्याचे म्हटले.

# राज्यातील सर्व जनतेला सुख समृध्दी लाभो !

## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे पांडूरंग चरणी साकडे । कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा

**पंढरपूर । वीरभूमी**– वारकरी भाविकांना तसेच राज्यातील सर्व जनतेला पांडुरंगाच्या कृपेने सुख, समृद्धी, लाभो त्यांच्या जीवनात ऐश्वर्य व भरभराट येवो असे साकडे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल–रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व सौ. सायली पुलकुंडवर तसेच मानाचे वारकरी यांच्या हस्ते आज पार पडली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, सर्व भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाने विविध कामे हाती घेतली आहेत. भाविकांच्या सेवेसाठी दर्शन मंडप स्काय वॉक, दर्शन रांग आदी विविध सुविधांची कामे प्रस्तावित केली आहेत. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सतत पाठपुरावा करीत आहेत. भविष्यात पंढरपूरात येणा–या वारकरी भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध होतील. तसेच महाराष्ट्रात सद्यस्थितीत विधानसभेच्या निवडणुका सुरू आहेत ही निवडणुकीची प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडो जास्तीत जास्त संख्येने मतदार राजांनी भाग घेऊन देशाची लोकशाही बळकट होण्यासाठी सर्व भाविकांचा तसेच जनतेचा सहभाग लाभो असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातील बाबुराव बागसरी सगर व सौ. सागरबाई बाबुराव सगर या दाम्पत्याची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आली. सगर दापत्य हे गवंडी काम करून आपला उदरनिर्वाह करतात. हे दाम्पत्य मागील १४ वर्षांपासून नियमितपणे वारी करीत आहेत. या दाम्पत्याला विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांच्या हस्ते राज्य परिवहन महामंडळाचा वर्षभर मोफत एसटी पास देण्यात आला. प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व त्यांच्या पत्नी



सायली पुलकुंडवार व मानाचे वारकरी यांचा सत्कार करण्यात आला.

# SPOT NEWS

## काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अनिताताई काळे यांची निवड

● **नगर । वीरभूमी –**

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सातव्या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. १२ जानेवारी रोजी होणाऱ्या या काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका तथा मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिताताई काळे यांची निवड करण्यात आली आहे. अनिताताई काळे यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात योगदान असून, त्या कवियत्री म्हणून देखील त्यांच्या काव्य संग्रह प्रकाशित झालेले आहेत. साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांची काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती काव्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी काळे यांची निवड झाल्याबद्दल संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवियत्री सरोज आल्हाट, कवी गिताराम नरवडे, गझलकार रज्जाक शेख, माजी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, कवी आनंदा साळवे, मा. प्रा. शंकरराव चव्हाण, प्राचार्या गुंफाताई कोकाटे, मिराबक्ष शेख, ज्ञानदेव पांडुळे, हेमलता गिते, सिमा गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे. काव्य संमेलन यशस्वी होण्यासाठी युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, सचिव प्रतिभा डोंगरे-खोडदे, सचिन जाधव, गौतम फलके, अक्षय ठाणगे, ऋषीकेश बोडखे, छाया वाबळे, कांता वाबळे, किरण ठाणगे, देविदास आंबेकर, प्रियंका डोंगरे-ठाणगे परिश्रम घेत आहे.



## ज्येष्ठ नागरिकांसाठी नगरमध्ये मोफत श्रवणदोष तपासणी शिबिर

● **नगर । वीरभूमी–**

रोटरी ई क्लब ऑफ़ एम्पॉवरीइंग युथ तर्फ़े गायत्री मंदिर चतुर्वेद भवन, महाजन गल्ली येथे दि. १५ नोहेबर २०२४ रोज़ी स. ९ ते संध्या. ६ पर्यंत, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफ़त श्रवणदोष तपासणी शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरासाठी नगर मधील श्रवणयंत्रासाठी नामांकित, अग्रगण्य व प्रसिद्ध असे स्वामी हिअरींग ॲण्ड सेंटरचे संचालक तेजस स्वामी आणि त्यांचे सहकारी मदत करणार आहेत. या शिबिरामध्ये मोफ़त श्रवणदोष तपासणी, प्रोग्रामिंग व मार्गदर्शन केले जाणार आहे. त्याच प्रमाणे सर्व शिबिरार्थींचे श्रवण यंत्र संदर्भातील शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी ई क्लब तर्फ़े क्लबचे अध्यक्ष स्विटी पंजाबी, सचिव डॉक्टर बिंदू शिरसाठ आणि ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विजया नीसळ यांनी केले आहे.

# विरोधकांचे विकास कामे न करता वेगळ्याच विषयावर राजकारण

### आमदार मोनिका राजळे । आखेगाव येथे गावभेट दौऱ्यात मतदारांशी संवाद

● **शेवगाव । वीरभूमी–**

विकासाचे आणि जनतेच्या कामाचे मुद्दे बाजूला ठेवून ही निवडणूक वेगळ्या वळणार न जाता विकासाच्या मुद्द्यावर गेली पाहिजे. या निवडणुकीत वेगळं चित्र पाहायला मिळतं आहे. आज जातीपातीचे, दबावाचे राजकारण केले जात आहे. कुठं आपला माणूस, आपला तालुका म्हणणाऱ्यांना दहा वर्षात आपली माणसं आठवली नाहीत. परंतु निवडणूक लागल्यावर गुणवंतांचा सत्कार करायला लागले. कुस्त्यांचे आखाडे भरवायला लागले. कार्यकर्त्यांना साधा काटा मोडला तरी धावत पळत यायला लागले. हे तात्पुरते प्रेम जनतेने ओळखले पाहिजे. दोन्ही उमेदवार मागील वेळी म्हणायचे ही शेवटची निवडणूक आहे. आता खोटं खोटं डोळ्याला रुमाल लावून डोळे पुसायला लागलेत. तुम्हाला एकच सांगेल या अपक्षांच्या नादी लागून मत वाया घालू नका, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी मतदारांना केले आहे.



तालुक्यातील आखेगाव, शिंगोरी, थाटे, वाडगाव, मुर्शतपुर, सालवडगाव, खरडगाव येथे आमदार राजळे यांचा गावभेट संवाद दौरा झाला. यावेळी आखेगाव येथे राजळे बोलत होत्या. यावेळी भाऊसाहेब पायघन, अर्जुन काटे, नानाभाऊ कोल्हे, मारुती पायघन, काकासाहेब खर्चन, त्रिंबक काटे, भगवान काटे, संभाजी काटे, अशोक काकडे, बाबासाहेब गोर्डे, काशिनाथ बोरुडे, कातकडे मेजर, ठबु ससाणे, मनोज पायघन, एकनाथ काटे, सुरेश गोर्डे, ज्ञानेश्वर गोर्डे, आप्पासाहेब काटे आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थीत होते.

पुढे बोलतांना आ. राजळे म्हणाल्या, पंकजा मुंडे यांनी मला जलसंधारण तसेच ग्रामविकासाचा मोठा निधी दिला होता. त्यामुळे विविध गावातील विकासाचे कामे मार्गी लावता आली. आज जे जातीच्या नावाने मते मागत आहेत. त्यांनी नेमके कोणासाठी काय केले? हे जनतेला माहीती आहे. लोकांना सर्व गोष्टी समजतात, त्यांना तुम्ही हलक्यात घेऊ नका. काहीजण तर आता आपला तालुका म्हणतात, मग गेल्या दहा वर्षे तुम्ही तालुक्यासाठी काय केले? असा प्रश्न उपस्थित करून सोसयाटीचे कर्ज देणार नाही, उस कारखान्याला घेतला जाणार नाही, अशी दमदाटी केली जात आहे. जनतेची अडवणूक झाली तर मी जनतेसोबत राहील, अशी ग्वाही राजळे यांनी यावेळी दिली.

सालवडगाव तसेच शिंगोरी येथील नागरिकांनी विरोधकांचा ताजनापुर योजने वरुन चांगलाच समाचार घेतांना, कितीही संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही अपप्रचाराला बळी पडणार नाहीत. विरोधकांच्या खोट्या प्रचाराला मतदानातून उत्तर देऊ असे म्हटले.

### मी केलेल्या कामांचे विरोधक श्रेय घेतात

■ निवडणूक आली की, ही मंडळी ताजनापूर योजनेवर खुप राजकारण करतात. मी जबाबदारी पूर्वक सांगते, या दहा वर्षात प्रत्येक बजेटमध्ये या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी मागणीनुसार दरवर्षी ३० ते ४० कोटी रुपयाची तरतुद केली आहे. २०१८ साली ड्रिप इरिगेशनचे सव्वाशे कोटी रुपयांचे टेंडर करुन घेतले आहे. टाकी पर्यंत पाणी आले, चाचणी घेत असताना चापडगाव परिसरातील दोन बंधारे भरुन घेतले. परंतु ज्यांचा काही संबंध नाही ते मंडळी तिथं जाऊन नारळ फोडत आहेत. हा खोटारडेपणा आता नागरिकांनी ओळखला पाहिजे. आखेगावसह १३ गावांना पाणी देण्यासाठी उपमुख्यमंत्री, जलसंधारण मंत्री यांच्या सोबत बैठक घेतली. तीन आठवड्यात तांत्रिक मान्यता मिळून त्याचा अध्यादेश आला. त्याचेही राजकारण केलं गेलं, असे राजळे म्हणाल्या.

## महायुतीचे उमेदवार आ.जगतापांना शीख, पंजाबी, सिंधी व खंडेलवाल समाजाचा पाठींबा

● **नगर । वीरभूमी–**

शहरातील शीख, पंजाबी, सिंधी व खंडेलवाल समाजाची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी नगरमधील गुरुद्वारा दया सिंह सभा येथे माजी आ.अरुण जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीचे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना शहरातील शीख, पंजाबी, सिंधी व खंडेलवाल समाजाचा जाहीर पाठींबा देण्यात आला. यावेळी शिख समजाचे अध्यक्ष बलदेवसिंग वाही, सिंधी समजाचे अध्यक्ष महेश मध्यान, पंजाबी समजाचे अध्यक्ष प्रदीप पंजाबी, खंडेलवाल समजाचे अध्यक्ष धोकरिया आदींनी आपापल्या समाजाच्या वतीने उमेदवार आ.संग्राम जगताप यांना पाठींबा व्यक्त करून निवडणुकीच्या विजयाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आ.अरुण जगताप म्हणाले, वारकरी संप्रदाय जपणाऱ्या जगताप परिवाराचा सर्व जाती धर्मांशी जिव्हाळ्याचे ऋणानुबंध वर्षानुवर्षे जपले गेले आहेत.

नगर शहरात विधानसभा निवडणुकीसाठी आ. संग्राम जगताप यांना सर्व स्तरातून मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आ. संग्राम जगताप सर्व नागरिकांच्या पाठींब्यावर व विकासाच्या अजेंड्यावर ही निवडणूक लढवत आहे. शीख, पंजाबी, सिंधी व खंडेलवाल समाजांचा पाठींबा आ.जगतापांना मिळाल्याने त्यांच्या त्यांचे हात अधिक बळकट होणार आहेत. या पाठींब्या बद्दल सर्व समाजाचे आम्ही ऋणी आहोत.

## मतदान प्रक्रियेच्या नियमांची माहिती जाणून घ्या

### शैलेश हिंगे । संगमनेर मतदारसंघातील निवडणूक कर्मचाऱ्यांना द्वितीय प्रशिक्षण

● **संगमनेर । वीरभूमी –**

मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश हिंगे यांनी केले.

वसंत लॉन्स येथे संगमनेर विधानसभा मतदारसंघातील १ हजार २४२ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी धीरज मांजरे उपस्थित होते.



श्री.हिंगे म्हणाले, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. निवडणूक प्रक्रिया व कार्यपद्धतीची माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याला असणे गरजेचे आहे.

यावेळी मतदान यंत्राची जोडणी, मतदान यंत्र हाताळणी, घोषणापत्र व फॉर्म अचूक भरणे, मतदान प्रक्रिया राबविताना येणाऱ्या अडचणीचे निराकरण याविषयी प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच प्रत्यक्ष मतदान यंत्रांची हाताळणीचे यांत्रिक प्रशिक्षण घेण्यात आले.

## खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी ७३ वर्षीय रुग्णाच्या लहान आतड्यात होणाऱ्या

# रक्तस्त्रावाला शोधण्यासाठी केला कॅमेरा कॅप्सुलचा उपयोग

● **पुणे । वीरभूमी –**

एक ७३ वर्षीय रुग्ण मलेना, हायपोटेन्शन आणि अशक्तपणाच्या त्रासाने युक्त अशा रुग्णाला पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलच्या आयसीयू मध्ये दाखल करण्यात आला. त्या रुग्णाला सातत्याने होणारा त्रास म्हणजे सातत्याने होणारा मलेना (काळे आणि चिकट शौच होणे), अशक्तपणा, डोक्याला हलकेपणा जाणवणे आणि कमी रक्तदाब इत्यादींचा त्रास होत होता. पचनसंस्थेशी निगडीत पूर्वी कोणतीही समस्या नसतांना रुग्णाला हळूहळू जेवणावरील इच्छा जाणे व वजन कमी होऊ लागले.

हॉस्पिटल मध्ये दाखल केल्यानंतर नियमित रक्तचाचणीत रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी (एचबी) ही ५.६ जी/डीएल, आढळली म्हणजे कुठेतरी रक्तस्त्राव होत होता. सुरुवातीच्या उपचारांनंतर हिमोग्लोबिनची पातळी ही ७.४ जी/डीएल वर पोहोचली पण नंतर लगेचच ती ढासळून ६.६ जी/डीएल वर आली, यामुळे रक्तस्त्रावाचे कारण शोधणे आवश्यक होते.

सुरुवातीच्या निदान प्रक्रियेमध्ये गॅस्ट्रोस्कोपी करण्यात येते पण वरच्या गॅस्ट्रोइंटरस्टायनल ट्रॅक्ट मध्ये कोणताही रक्तस्त्राव सापडला नाही आणि कोलोनोस्कोपी केल्यानंतर सुध्दा आतडे आणि टर्मिनल इलुनम ची चाचणी केल्यानंतर त्यातूनही रक्तस्त्रावाचे स्थान सापडू शकले नाही. त्यानंतर पोटात काही समस्या आहे का हे तपासण्यासाठी तसेच व्हस्क्युलर समस्या तपासण्यासाठी ओटीपोटाची सीटी न्जोप्लास्टी करण्यात आली तरीही कोणतीच ठोस समस्या समोर येत नव्हती.

रुग्णाची एकंदरीत स्थिती पाहता डॉक्टरांच्या टिमने अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या कॅप्सुल एन्डोस्कॉपी करण्याचा निर्णय घेतला, हे एक नॉन इन्व्हेझिव्ह निदान उपकरण आहे ज्यामुळे संपूर्ण छोट्या आतड्याची तपासणी करता येते कारण परंपरागत प्रक्रियेमध्ये या अवयवापर्यंत पोहोचणे खूपच अवघड असते. या मध्ये रुग्णाच्या शरीरात एक अगदी छोटा कॅमेरा असलेली कॅप्सुल सोडली जाते, जी पुढील १२ ते १४ तासांमध्ये गॅस्ट्रोइंटरस्टायनल ट्रॅक्ट मध्ये पोहोचते. त्यातून काही फोटोज काढले जातात आणि ते रुग्णाने धारण केलेल्या




बाहेर असलेल्या एक्स्टर्नल रॅकॉर्डर रेकॉर्ड करत असतो.

या प्रक्रिये विषयी आणि उपचारां विषयी बोलतांना पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल चे कन्सल्टंट गॅस्ट्रोन्ट्रोलॉजिस्ट डॉ. मंगेश बोरकर यांनी सांगितले कॅप्सुल ने आपला पचनसंस्थेतील प्रवास पूर्ण केल्यानंतर त्यांतून मिळालेली माहिती गोळा करुन तिचा सखोल अभ्यास केला जातो. आंम्हाला या केस मध्ये असे आढळून आले की रुग्णाच्या जेजूनियम आणि इल्युनियम मध्ये फोड आले होते आणि त्यामुळेच रुग्णाच्या आतड्यांमध्ये रक्तस्त्राव होत होता. या अचूक निदाना मुळे आम्ही अचूकपणे निदान करुन योग्य अशी उपचार पध्दती निवडू शकलो आणि अंतिम निष्कर्शात सुधारणा झाली. रुग्णाने योग्य अशा उपचारांना साथ दिल्यामुळे योग्य उपचार होऊन त्यास आम्ही ५ दिवसात घरी पाठवू शकलो.

मणिपाल हॉस्पिटल खराडी, चे हॉस्पिटल डायरेक्टर श्री परमेश्वर दास यांनी सांगितले पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये आम्ही नेहमीच वैद्यकीय क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रुग्णासाठी अचूक निदान आणि योग्य उपचार उपलब्ध करत असतो. या केस मध्ये कॅप्सूल एन्डोस्कोपीचा उपयोग केल्यामुळे आमच्या रुग्णाधिष्ठित अशा उपचारां विषयीची आमची वचनबध्दता तर अधोरेखित होतेच पण त्याच बरोबर समाजासाठीचे सुधारीत आरोग्य निष्कर्श ही अधोरेखित होतात.

### मणिपाल हॉस्पिटल्स विषयी

आरोग्य क्षेत्रातील एक आघाडीचे असलेले मणिपाल हॉस्पिटल्स हे भारतातील सर्वांत मोठ्या हॉस्पिटल नेटवर्क्स पैकी एक असून ते वर्षाला ७ दशलक्षां हून अधिक रूग्णांना सेवा प्रदान करतात. परवडणार्या दरात, उच्च गुणवत्तेची आरोग्य सेवा मल्टी स्पेशॅलिटी आणि टर्शरी केअर देण्याच्या क्षेत्रासह ते आऊट ऑफ हॉस्पिटल केअर क्षेत्रातही कार्यरत आहे. भारतातील मडिका सिनर्जी हॉस्पिटल्स आणि एएमआरआय हॉस्पिटल्स लिमिटेड (सप्टेंबर २०२३ मध्ये अधिग्रहण) चे अधिग्रहण केल्यानंतर आजमितीस संपूर्ण भारतात मणिपाल हॉस्पिटल्स कडून १९ शहरांतील ३७ हॉस्पिटल्स च्या माध्यमातून १०,५०० हून अधिक खाटांचे व्यवस्थापन, ५,६०० हून अधिक कुशल डॉक्टर्स आणि १८,६००हून अधिक कर्मचारी यांचे नेटवर्क निर्माण झाले आहे.

मणिपाल हॉस्पिटल्स हे नेहमीच जगभरांतील रुग्णांना उच्च गुणवत्तेचे आरोग्य सुविधा देणारे हे मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटल ठरले आहे. मणिपाल हॉस्पिटल्सचे उपचार हे एनएबीएच, एएएचआरपीपी मान्यताप्राप्त असून त्यांच्या नेटवर्क मधील अधिकतर हॉस्पिटल्स ही एनएबीएल, ईआर प्रमाणन हे त्यांच्या ब्लड बँकांना प्राप्त आहेत. हे सर्वोत्कृष्ट आरोग्य सुविधांसाठी ओळखले जाते. मणिपाल हॉस्पिटल्स हे प्रतिथयश आणि रूग्णांकडून तसेच भारतातील अनेक ग्राहक सर्वेक्षणातून सर्वाधिक रेटिंग मिळालेले हॉस्पिटल ठरले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## नेवासा मतदार संघातील ६१९ अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रशिक्षण

**● नेवासा । वीरभूमी–**

नेवासा विधानसभा मतदारसंघातील ६१९ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे द्वितीय प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी ४७४ कर्मचाऱ्यांनी पोस्टल मतदान केले. नेवासा येथील ज्ञानोदय इंग्लिश स्कूल व रामलीला लॉन्स येथे झालेल्या प्रशिक्षण सत्रास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भेट देत पोस्टल मतदान प्रक्रियेची पाहणी केली. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संजय बिरादार, नायब तहसीलदार किशोर सानप, सोनाली मात्रे, समन्वयक अधिकारी विकास थोटे व विशाल यादव आदी उपस्थित होते. या प्रशिक्षण सत्रास निवडणूक निर्णय अधिकारी उंडे यांनी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली, टपाली मतपत्रिका, निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे, मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे, सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, मतदान केंद्र उभारणी करणे, अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. ईव्हीएम मशीनच्या वापराबद्दल आणि त्याच्या हाताळणीबद्दल सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बिरादार यांनी प्रशिक्षण दिले.

## नगर शहरात चेनस्नॅचिंग करणारा बल्ली यादव जेरबंद

**● नगर । वीरभूमी–**

नगर शहरात चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. बलराम उर्फ बल्ली रामचिंत यादव (वय २५, रा. सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) असे त्याचे नाव असून, त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फिर्यादी श्रीमती अलका रमेश कांबळे (वय ६९, रा. किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, नगर) या दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास गुलमोहर रोडने पायी जात असताना पाठीमागून येत दुचाकीस्वाराने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून नेली होती. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. एलसीबीच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेतला असता पथकास गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी बल्ली यादव याने केला असून, तो नगर शहरातील ढवणवस्ती, माऊलीनगर येथे आलेला आहे. त्यानुसार पथकाने नमूद ठिकाणी जाऊन संशयित दुचाकीस्वारास तात्काळ अटक केली. त्याने गुन्ह्याची कबुली देऊन अक्षय ज्वेलर्स, लोणी (ता. राहाता) येथील मीरा बनसोड यांना दागिने विकल्याची माहिती दिली. तपास पथकाने पंचासमक्ष अक्षय ज्वेलर्स, लोणी येथून ५० हजार रुपये किमतीची सोन्याची लगड जप्त केली. आरोपीस तोफखाना पोलीस ठाणे येथे मुद्देमालासह हजर करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, पोसई तुषार धाकराव व पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, मनोहर गोसावी, गणेश भिंगारदे, संतोष खैरे, बाळासाहेब गुंजाळ, विशाल तनपुरे, रमिजराजा आत्तार व मेघराज कोल्हे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# चैतालीताई काळेंच्या कॉर्नर सभांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## आ. आशुतोष काळेंच्या प्रचारात पत्नी चैतालीताई काळे यांचा सक्रिय सहभाग

**● कोपरगाव । वीरभूमी –**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मोजकेच दिवस शिल्लक राहिले असून कोपरगाव विधानसभा मतदार संघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार आ. आशुतोष काळे यांच्या प्रचारार्थ त्यांच्या अर्धांगिनी जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. चैतालीताई काळे या देखील प्रचारात सक्रीय असून मतदार संघातील ग्रामीण भागातील गावागावात त्यांचा प्रचार फेऱ्यांचा व बैठकांचा धडाका सुरु असून कोपरगाव शहरातील विविध प्रभागातील त्यांच्या कॉर्नर सभा चांगल्याच गाजत असून सर्वत्र नागरिकांसह महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे कोपरगाव विधानसभा मतदार संघात दिसून येत आहे.



आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघात केलेली विविध विकासकामे व तसेच कोपरगाव शहरातील अनेक महत्वपूर्ण कामांबरोबरच नागरिकांसह महिलांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असणारा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ५ नंबर साठवण तलावाच्या माध्यमातून सोडविला असून नागरिकांना तीन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. येत्या काही दिवसात वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण होवून सर्वच नळ कनेक्शन नवीन वितरण व्यवस्थेवर स्थलांतरीत केल्यानंतर नागरिकांना रोज नियमित पाणी मिळणार आहे. त्यामुळे कोपरगाव शहराच्या नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून हाच झालेला विकास जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे मतदारांसमोर मांडत आहे आणि त्यांच्या कॉर्नर सभांना देखील मोठी गर्दी होत आहे.

गोदाकाठ महोत्सवाच्या माध्यमातून प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे व सौ.चैतालीताई काळे यांनी बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या मालाला हक्काची बाजारपेठ मिळवून देवून त्यांची आर्थिक उन्नती साधली आहे. बचत गटाच्या महिलांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना विविध बँकांच्या माध्यमातून अर्थ सहाय्य मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. याकामी आ.आशुतोष काळे यांचे मोठे सहकार्य मिळत असून बचत गटाच्या महिलांचे मोठे संगठन करून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी सौ.चैतालीताई काळे सातत्याने प्रयत्न करीत असून सुरु असलेल्या विधानसभा निवडणुकीत देखील त्यांनी आ.आशुतोष काळेंच्या प्रचाराची धुरा समर्थपणे सांभाळत आहे.

आ.आशुतोष काळेंचे कोपरगाव शहरासह मतदार संघाच्या विकासात मोठे योगदान असून रस्ते, वीज, पाणी, आरोग्य हे मुलभूत प्रश्न या पाच वर्षात मार्गी लागले आहे. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांनी मिळवून दिला आहे.महायुती शासनाने सुरु केलेल्या माझी लाडकी बहिण योजनेचा मतदारसंघातील सर्वच पात्र माता भगिनींना लाभ मिळावा यासाठी स्वत:ची यंत्रणा उभी करून सर्व महिलांचे अर्ज भरून घेवून अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करून जवळपास सर्वच पात्र महिला भगिनींना या योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. त्यामुळे आ.आशुतोष काळे यांच्याकडून नागरिकांच्या मतदारसंघाच्या विकासाच्या अपेक्षा नक्कीच वाढल्या असून त्या येत्या काळात पूर्ण देखील होणार याची सुज्ञ मतदारांना पाच वर्षात झालेल्या विकास कामांवरून खात्री पटलेली आहे. त्यामुळेच आ. आशुतोष काळेंच्या प्रचारार्थ होत असलेल्या कॉर्नर सभांना मोठी गर्दी होत आहे.

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचा आज गळीत हंगाम शुभारंभ

**● संगमनेर । वीरभूमी–**

सहकारासाठी दिशादर्शक ठरलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४ -२५ या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा. विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात व सौ. कांचनताई थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, ॲड. माधवराव कानवडे, डॉ. जयश्रीताई थोरात, कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांच्या उपस्थिती होणार असल्याची माहिती व्हा. चेअरमन संतोष हासे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना असे म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात कारखान्यावर सभासद, शेतकरी व कार्यक्षेत्राबाहेरिल ऊस उत्पादक यांचाही मोठा विश्वास आहे.

या कारखान्याने मागील हंगामात कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांकरता ३०१५ रुपये भाव दिला होता. सन २०२४-२५ या गणित हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा. आमदार बाळासाहेब थोरात व सौ कांचनताई थोरात, मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, ॲड. माधवराव कानवडे, बाजीराव पाटील खेमनर, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, सुधाकर जोशी, संपतराव डोंगरे, शंकर पा खेमनर, हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, राजेंद्र गुंजाळ, सोमेश्वर दिवटे, मिलिंद कानवडे, निखिल पापडेजा, विश्वासराव मुर्तडक, दिलीपराव पुंड, सौ अर्चनाताई बालोडे, यांच्यासह सर्व जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी सदस्य अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी या ऊस गळीत हंगामाच्या शुभारंभ कार्यक्रमासाठी तालुक्यातील सभासद व शेतकरी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

# मतदान प्रक्रिया नियमानुसार राबवावी

**माणिक आहेर । शिर्डी मतदारसंघातील कर्मचाऱ्यांना मतदान द्वितीय प्रशिक्षण**



**● शिर्डी । वीरभूमी –**

मतदानाच्या दिवशी गडबड, गोंधळ होऊ न देता सुटसुटीतपणे आणि नियमानुसार मतदान प्रक्रिया राबवावी, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर यांनी दिल्या.

शिर्डी विधानसभा मतदारसंघातील ६०० मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या द्वितीय प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल मोरे, नायब तहसीलदार हेमंत पाटील, बाळासाहेब मुळे आदी उपस्थित होते.

श्री. आहेर यांनी मतदान प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मतदान कक्षात गर्दी होवू न देता एकाचवेळी चार-पाच जणांना प्रवेश देण्यास यावा, अशा सूचनाही श्री.आहेर यांनी यावेळी दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर व कोपरगाव निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके यांचे निवेदन व्हिडीओ चित्रफीतीच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. शारदा विद्यालयात प्रत्यक्ष मतदान यंत्रांची हाताळणीचे यांत्रिक प्रशिक्षण घेण्यात आले.

# सतत विचारसरणी बदलणाऱ्यांचा प्रचार करणार नाही

## युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्मितल वाबळे । प्रदेश काँग्रेसने स्मितल वाबळे यांना केले कार्यमुक्त

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कार्यकारिणीचे निवडणुक प्रभारी अजय चिकारा यांनी नगर जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्मितल वाबळे यांच्यावर महाविकास आघाडीचा धर्म न पाळता बंडखोर अपक्ष उमेदवार राहूल जगताप यांच्या प्रचारात सक्रिय झाल्यामुळे श्री. वाबळे यांना जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदावरून कार्यमुक्त केले आहे. याबत श्री. चिकारा यांनी श्री. वाबळे यांना दि. ११ रोजी लेखी पत्र देऊन कार्यमुक्त केले आहे.



अर्ज भरण्याच्या कालावधीत आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार गटाची हक्काची जागा नाट्यमय घडामोडीनंतर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला गेली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ. अनुराधा नागवडे यांनी ऐनवेळी पक्षाला सोडचिठ्ठी देत खा. संजय राऊत यांच्यामार्फत शिवसेनेत प्रवेश केला व साम दाम दंड भेद वापरून पुर्ण ताकदीने उमेदवारी. खेचून आणल्यामुळे नाराज झालेल्या मा. आ. राहूल जगताप व काँग्रेस नेते घनशाम शेलार यांनी बंडखोरीचा पवित्रा घेऊन अनुक्रमे श्री. जगताप यांनी अपक्ष तर घनशाम शेलार यांनी प्रहार जनशक्ती पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केले. नंतर घनशाम शेलार यांनी उमेदवारी मागे घेतली.

पूर्वाश्रमीचे राहूल जगताप यांचे खंदे समर्थक व ना.बाळासाहेब थोरात यांच्याशी असलेले जिव्हाळयाचे संबंध यामुळे स्मितल वाबळे यांनी काँग्रेस पक्षात सक्रिय होऊन युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पद मिळविले व तत्कालिन जिल्हाध्यक्ष राजेंद्र नागवडे यांच्याशी जमवून घेतले. राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर श्री. नागवडे दांपत्याने वर्षभरापूर्वी अजित पवार गटात प्रवेश केला. श्रीगोंद्याची जागा भाजपने न सोडल्यामुळे पुन्हा नागवडे यांनी उमेदवारीची चाचपणी करत मोठ्या संघर्षाने शिवसेनेत प्रवेश करून उमेदवारीही मिळवली. मात्र काँगेस निष्ठावंतांना ही बाब न रूचल्यामुळे त्यांनी प्रत्येकाने स्वतःच वेगवेगळया दिशा शोधल्या व शहराध्यक्ष मनोहर पोटे व स्मितल वाबळे यांनी अपक्ष उमेदवार राहूल जगताप यांच्या गोटात जाऊन प्रचार सूरू केला. तर तालुकाध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी आघाडीचा धर्म पाळत नागवडे यांच्या प्रचारात उडी घेतली. त्यामुळे आघाडीतील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस नेतृत्वाच्या ही बाब लक्षात आणून दिल्यामुळे श्री. वाबळे यांच्यावर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत त्यांना सध्याच्या पदांवरून कार्यमुक्त केले आहे.

### स्मितल वाबळे अपक्ष राहुल जगताप यांच्या प्रचारात

■ नागवडे यांनी काही वर्षांत काँग्रेस, भाजप, पुन्हा काँग्रेस, राष्ट्रवादी अजित पवार व नुकताच निवडणुकांवर डोळा ठेवून शिवसेना पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळवली. नागवडे यांच्या दृष्टीने ठामपणे पक्षांची डावे, उजवे ध्येयधोरणे, सर्वधर्म समभाव, घटनेतील सर्व धर्मांना, जाती- पातींना एक घेऊन समृद्ध भारत बनविणे, संविधानाचे रक्षण करणे या बाबी गौण असून त्यांच्या निशाण्यावर फक्त आमदारकीचा डोळा फोडणे हेच आहे. जरी आम्ही वरीष्ठ नेत्यांच्या आदेशानुसार काम करत असलो तरी कुणाचा प्रचार करावा यालाही काही सीमा आहेत. त्यांच्या सततच्या दलबदलू धोरणांमुळे महाविकास आघाडीचे अन्याय झालेले व कधीही निष्ठा ढळू न दिलेले स्वच्छ चारित्र्याचे राहूल जगताप यांचा प्रचार सुरू केला आहे. आम्हाला निधर्मी राष्ट्र बनविण्यासाठी कोणत्याही त्यागाला सामोरे जाण्याची तयारी आहे.

## संकटाला संधी मानल्यास जीवनातील आव्हाने पेलता येतात : विनोद शिरसाठ




**● पाथर्डी । वीरभूमी–**

जीवनात येणाऱ्या अडचणी, संकटं यांचा सामना करताना त्यांचे संधी मध्ये रूपांतर केल्यास विद्यार्थ्यांना आव्हाने पेलता येतात, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत विनोद शिरसाठ यांनी व्यक्त केले

पाथर्डी येथे बेस्ट फाऊंडेशन आयोजित युवकांपुढील आव्हाने व संधी या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अरुणोदय ग्रामीण युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुल मोरे, उद्योजक राजेंद्र कोटकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिपक देशमुख, बेस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष भाऊसाहेब गोरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिरसाठ म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतः च्या क्षमता ओळखून त्यांचा पुरेपूर परंतु योग्य वापर करावा. हार्ड स्कील व सॉफ्ट स्कील या द्वारे वेळेचे नियोजन, आपली आवड, अवांतर वाचन, छंद, कला यांची सांगड घालता येते. थोर व्यक्तींची चरित्र वाचुन त्यांचे आदर्श समोर ठेवावे. प्रश्नांच्या मुळाशी जाऊन समस्या निराकरण करताना थोर व्यक्तींच्या कार्याचे अनुकरणाने अनेक अडचणी अडथळे पार करता येतात.

या वेळी मान्यवरांनी बेस्टच्या कार्याचा आढावा घेत उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. करिअर मार्गदर्शन, प्लॅन एक व प्लॅन दोन, अभ्यासाचा मूलमंत्र, शिक्षणाचे महत्त्व, आजच्या काळातील उपलब्ध संधी या संदर्भात विद्यार्थ्यांशी चर्चा केली मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना राजेंद्र कोटकर यांनी दिवाळी फराळाचे वाटप केले. प्रास्ताविक केंद्रप्रमुख रामनाथ शेळके, सुत्रसंचलन महेश वाघमोडे, स्वागत गणेश तुपे यांनी केले तर आभार रमेश वाधवणे यांनी मानले.

# तरुण पिढीचे भविष्य घडविण्यासाठी कटिबद्ध

## आ.आशुतोष काळे । एमआयडीसीच्या माध्यमातून बेरोजगारी कायमची हटणार

**● कोपरगाव । वीरभूमी –**

२०१९ ला मतदार संघातील जनतेने मला आशिर्वाद दिले. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी पाच वर्षात मतदार संघाचे विविध विकासकामे मार्गी लावली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असतांना त्यांच्या मदतीने विकासासाठी मोठा निधी मिळविला व मतदार संघातील विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. राज्यातील विविध विकसित मतदार संघाच्या झालेल्या विकासाचा अभ्यास करून यापुढील काळात सर्वच बाबतीत कोपरगाव मतदार संघ विकसित मतदार संघ म्हणून नावारूपाला आणायचा आहे. आजवर रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध नसल्यामुळे मतदार संघातील युवकांना रोजगारासाठी मतदारसंघाच्या बाहेर जावे लागत होते. परंतु भविष्यात हि परिस्थिती बदलणार असून येणाऱ्या काळात मतदार संघातील सोनेवाडी व सावळीविहीर गावच्या सीमेवर उभारल्या जाणाऱ्या एमआयडीसीमध्ये मोठे उद्योग उभे राहणार आहेत. मतदार संघातील युवकांना एमआयडीसीच्या माध्यमातून मतदार संघातच रोजगार उपलब्ध होणार असून मतदार संघातील बेरोजगारी कायमची हटली जाणार असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

विधानसभा निवडणूक जशी जवळ येत आहे तसा कोपरगाव मतदार संघात आ.आशुतोष काळे यांच्या प्रचाराचा वेग अधिकच वाढला आहे. मतदार संघात केलेल्या विकासकामांच्या माध्यमातून प्रत्येक मतदारांशी व्यक्तिगत संपर्क ठेवून असलेल्या आ.आशुतोष काळे यांचा जनसंपर्क अतिशय दांडगा आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने प्रत्येक मतदारापर्यंत ते पोहोचले आहेत व कॉर्नर प्रचार सभांच्या माध्यमातून मतदार संघाच्या विकासाच्या संकल्पना मांडत असून या सभांना नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद देखील मिळत आहे. कोपरगाव शहरातील संजय नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या कॉर्नर सभेत त्यांनी नागरिकांशी संवाद साधतांना यापुढील काळात मतदार संघातील बेरोजगारी कायमची हटविण्याबाबत सुतोवाच करतांना आ.आशुतोष काळे म्हणाले की, मतदार संघातील सोनेवाडी व सावळीविहीर गावच्या सीमेवर एमआयडीसीला मंजूरी मिळून काही दिवसांपूर्वी भूमिपूजन देखील झाले आहे. सोनेवाडी, सावळीविहीर पंचक्रोशीतीलच नव्हे तर मतदार संघातील हजारो बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होवून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. मतदार संघाच्या विकासात युवकांच्या हिताला प्राधान्य देवून तरुणाईला सहभागी करून घेवून त्यांचे उज्वल भविष्य घडवायचे आहे. त्यामुळे यापुढील काळात मतदार संघातील सर्वच बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध होवून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्न करणार आहे.

कोपरगाव शहरालगत असलेल्या औद्योगिक वसाहतीमधील एकूण १७३.३४ हेक्टर म्हणजेच ४३३ एकर उपलब्ध असलेली जागा एम.आय.डी.सी.कडे वर्ग करण्याबाबत सविस्तर चर्चा होवून पालकमंत्री व उद्योगमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून त्याठिकाणी एम.आय.डी.सी. उभारण्याचा मनोदय आहे. त्या एमआयडीसीमध्ये




विविध प्रकारचे व्यवसाय उपलब्ध होतील. त्यातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला यांनाही यातून खूप मोठ्या प्रमाणामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मतदार संघातील रस्त्यांची निर्मिती, पाणी व आरोग्याचे प्रश्न सोडवून नागरिकांच्या अडचणी दूर करून मूलभूत सुविधा देणे हे तर माझे कर्तव्य आहे परंतु मतदार संघातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे हि आमदार म्हणून माझी जबाबदारी आहे. स्थानिकांना रोजगार मिळेल याबाबत निश्चिंत रहावे. भविष्यात इतर विकसित शहराच्या बरोबरीत कोपरगाव मतदार संघाचा विकास करण्याचे माझे स्वप्न आहे. त्यासाठी मतदार संघातील जनतेची साथ आणि आशीर्वाद अत्यंत महत्त्वाचे असून २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतांनी निवडून द्यावे असे आवाहन आ.आशुतोष काळे यांनी केले आहे.

# यापुढे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी काम करणार

## सुनिल रासने यांचा समर्थकांसह निर्धार । शेवगावात ‘कौल गुलालाचा’ कार्यक्रम

**● शेवगाव । वीरभूमी–**

जीवनात भाजीभाकरीची जशी गरज आहे, तशी गरज विचारांची आहे. गेली ३० ते ४० वर्ष हाच विचार लोकांमध्ये घेवून जातोय. जात, धर्म याच्यापलीकडे माणुसकी नावाची जात आहे. ती आपल्याला जगायची आहे. याच भावनेतून आज वेगळा निर्णय घेत यापुढे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासाठी काम करण्याचा निर्धार ज्येष्ठ नेते सुनिल रासने यांनी केला.

शेवगाव येथे सुनिल रासने व बंटी म्हस्के मित्र मंडळाच्या वतीने ज्येष्ठ मतदारांचा सन्मान व दिवाळी फराळ या निमीत्त आयोजीत केलेला ‘कौल गुलालाचा’ या कार्यक्रमामध्ये रासने बोलत होते. यावेळी राजेंद्र ढाकणे, रमेश जाधव, विष्णू जताडे, आण्णासाहेब लबडे, चंद्रकांत खांबट मेजर, बापु देशमुख मेजर, मुरलीधर बोडखे, नवनाथ केदार, रमेश दिगोडे, बाबुराव फुंदे, गणेश महाराज आव्हाड, शंकर



काटे, सदाशिव दराडे आदी ज्येष्ठ उपस्थित होते.

यावेळी रासने म्हणाले की, माझ्या मनामध्ये ज्वालामुखी सारख्या भावना आहेत. जो विचार आतापर्यंत सांभाळला, जपला त्याने आपल्याला काय दिले? असा प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, जनतेसाठी काम करत असतांना अनेक कार्यकर्ते जोडले. त्यांचा आणि आमचा एकच विचार होता. मात्र भाजपाने २०१४ विधानसभेसाठी आणि २०१९ लोकसभेमध्ये इतर पक्षाचा उमेदवार आमच्यावर लादला. यामुळे मागील पाच वर्ष खुप सहन केले. या भावना वरिष्ठ पातळीवर पोहचवण्यासाठी मुंबईपर्यंत जावून लोकसभेला उमेदवार बदलण्याची मागणी केली. मात्र पक्षाने उमेदवार न बदलल्याने आम्हाला वेगळी भुमिका घ्यावी लागली. ज्या पक्षात आहे ते विचारत नाहीत आणि जेथे नाही तेथे बोलावत नाही. यामुळे आपल्याल एक निर्णय घ्यायचा आहे. आपण ज्याला कौल देवू त्याच्याकडे विजयाचा गुलाल असेल असे सांगत यापुढे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे काम करण्याची भुमिका स्पष्ट केली.

बंटी म्हस्के म्हणाले की, हिंदूत्वाच्या नावाखाली सध्या जे थोतांड चालू आहे ते जनतेला न पटण्यासारखं आहे. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सत्ता आहे तरी हिंदू धोक्यात आहे असे म्हणून आपली फसवणुक केली जाते. यास तरुणांनी बळी पडू नये.

सुनील रासने यांनी आपली भूमिका जाहीर केल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शेवगाव तालुकाध्यक्ष हरिष भारदे, प्रणाली ढाकणे, माधवराव काटे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेश लांडे, बंटी म्हस्के, दिलीप सुपारे, बंडू चव्हाण, सागर पवार, तुकाराम शिंदे, गणेश शहाणे, अतुल रासने आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक नवनाथ कवडे यांनी केले. सूत्रसंचलन दिपक कुसळकर यांनी केले तर दिलीप सुपारे यांनी आभार मानले.


# पीएमश्री झेडपी शाळेत मतदान जनजागृती अभियान

**● पाथर्डी । वीरभूमी–**

देशातील लोकशाहीला सशक्त व सुदृढ बनवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान प्रक्रियेत सहभागी होणे गरजेचे आहे. शासनाकडे आपले हक्क मागताना आपले कर्तव्य ही करणे गरजेचे आहे. म्हणून आपले मतदानाचे पवित्र कर्तव्य प्रत्येकाने बजवावे व जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे मिशन ७५ टक्के मतदान हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन नोडल अधिकारी रामनाथ कराड यांनी केले.

शहरातील पीएमश्री जिल्हा परिषद शाळा व मुलींची केंद्रीय शाळा येथे मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री व दैनिक वीरभूमीचे प्रतिनिधी अनिल खाटेर उपस्थित होते. यावेळी केंद्र प्रमुख बाबा गोसावी, दगडु महांडुळे, मच्छिंद्र गोरे, मुख्याध्यापिका नंदा तुपे, मुख्याध्यापिका रत्नप्रभा महांडुळे, अतुल तरवडे आदी उपस्थित होते.

यावेळी शाहीर गाडेकर यांनी लोकगीतांतून व गायक बिपिन




खंडागळे यांनी प्रास्ताविकातून व शपथेद्वारे मतदानाचे महत्त्व पटवून देत प्रबोधन केले. या अभियानाची माहिती देताना कराड म्हणाले की, पाथर्डी तालुक्यात मागील निवडणुकीत सहा मतदान केंद्रावर अतिशय कमी म्हणजे ५० टक्के पेक्षाही कमी मतदान झाले. या ठिकाणी खास लक्ष केंद्रित करून इतर ठिकाणीही मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत. या अभियानात विविध उपक्रम राबवून मतदारांचे प्रबोधन करण्यात येत आहे. मतदानाचा हक्क व कर्तव्य बजावणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजवावा.

यावेळी बोलताना मंत्री यांनी येत्या २० तारखेला विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना मतदानाचा आग्रह धरावा असे आवाहन केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती अभियान राबवण्याबाबतची संकल्प पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अतिशय सुरेखपणे मानवी साखळीद्वारे मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठीचे प्रात्यक्षिक सादर केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका ज्योती जाधव, दिपाली भोसले, मीना ठोंगिरे, सुरेखा बडे, मनीषा फटांगरे, शोभा फुंदे, अर्चना खाडे, वैशाली जायभाये, शीला नागरे, लता भंडारे यांनी परिश्रम घेतले.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका नंदा तुपे यांनी केले. सूत्रसंचलन अनुराधा तरवडे यांनी केले तर भावना देवरे यांनी आभार मानले.

# मविआ सरकार महिलांना तीन हजार रुपये महिना व सुरक्षितता देणार

## डॉ. जयश्रीताई थोरात । ग्रामीण भागामधून पदयात्रांना मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद

**● संगमनेर । वीरभूमी–**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रात कायम महिलांचा सन्मान झाला आहे. मात्र मागील अडीच वर्षांमध्ये महाराष्ट्रामध्ये महिला असुरक्षित असून महायुती सरकार फक्त निवडणुकीसाठी खोटे बोलत आहेत. या उलट महाविकास आघाडी सरकार महिलांना ३ हजार रुपये महिन्यासह सुरक्षितता देणार असल्याने सर्व महिलांनी महाविकास आघाडीच्याच पाठीशी उभे राहावे असे आवाहन डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले असून ग्रामीण भागातून काढलेल्या पदयात्रांना मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

काँग्रेस नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या प्रचारार्थ डॉ जयश्रीताई थोरात यांनी संगमनेर खुर्द, चंदनापुरी, झोळे,खांडगाव, हिवरगाव पावसा या ठिकाणी नागरिकांशी संवाद साधला यावेळी महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, आमदार बाळासाहेब थोरात हे आपल्या तालुक्याचे कुटुंबप्रमुख आहेत. तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाचा विकास व्हावा यासाठी अविश्रांत काम त्यांनी केले आहे. एकही दिवस कधी सुट्टी घेतली नाही. संगमनेर तालुका हाच परिवार मानला.

आज चांगले वातावरण आणि सर्व क्षेत्रातील विकास यामुळे संगमनेर तालुक्याचे नाव राज्यात घेतले जात आहे. सुसंस्कृत राजकारणाची आपली परंपरा आहे ती आपल्याला पुढे न्यायची आहे.

महाराष्ट्राने कायम महिलांचा सन्मान केला आहे. मात्र मागील अडीच वर्षांमध्ये महिला सुरक्षित नाहीत. निवडणुकीसाठी जमले बाजी करणारे भाजप सरकार आहे. खोटे बोल पण रेटून बोल ही त्यांची पद्धत असून पंधरा लाख रुपये देणारे सरकार पंधराशे रुपये वर आले. पण त्यावर भरोसा नाही.

आमदार बाळासाहेब थोरात यांच्या पुढाकारातून महाविकास आघाडीने कायम विश्वासाने काम केले असून दोन लाखाची विनाआट कर्जमाफी केली होती. आता नव्याने महिलांसाठी महालक्ष्मी योजनेतून दर महिन्याला तीन हजार रुपये देण्याची घोषणा केली असून महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे. याचबरोबर वर्षाला सहा गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहे.

महाविकास आघाडी म्हणजे विश्वासाची माणस आहेत. आमदार बाळासाहेब थोरात या मध्ये प्रमुख नेते आहेत. आपण सर्वांशी त्यांच्या पाठीशी



उभे राहून राज्यातील महायुती सरकार उखडून टाकण्याबरोबरच सर्वाधिक मतांनी आमदार थोरात त्यांना विजय करण्यासाठी काम करावे असे आवाहन केले.

अर्चना बालोडे म्हणाल्या की, ही निवडणूक महिलांनी हातात घेतली आहे. महिलांचा अपमान करणाऱ्या सरकारला आपण त्यांची जागा दाखवणार असून आपल्या तालुक्याचे कुटुंब प्रमुख आमदार बाळासाहेब थोरात यांच्यासाठी पुढील आठ दिवस महिला भगिनींनी घरोघर जाऊन प्रचारात सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले.गावोगावात मतदारांशी संवाद साधताना डॉ. जयश्रीताई थोरात व कार्यकर्त्यांचे नागरिक व महिलांनी मोठे उत्स्फूर्त स्वागत केले.